# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/१०/२०२४ (गुरूवार) सकाळ**


## मौदा पोलिसांची रेती चोरीवर दोन वेगवेगळया कारवाई

१) दिनांक २३/१०/२०२४ रोजी रात्री २१/०० वाजता चे दरम्यान पोलीस नायक प्रणय बनाफर सोबत पोलीस अमंलदार अतुल निंबार्ते, पोलीस अमंलदार शुभम ईश्वरकर, पोलीस ठाणे मौदा परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन खबर मिळाली की, क्रमांक MH-27/DL-7166 तसेच ट्रक क्रमांक MH-27/DP-7114 मध्ये चोरीची रेती भरुन भंडारा कडुन नागपूर कडे जात आहे. अशा माहीती वरुन पोलीस नायक प्रणय बनाफर यांनी कोणताही विलंब न करता सदर माहीती वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे पोलीस ठाणे मौदा यांना त्वरीत देवून त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे सोबत असलेले कर्मचारी अतुल निंबार्ते व शुभम ईश्वरकर सह रबडीवाला हॉल समोर वाय पॉईट समोर नाकाबंदी करुण नाकाबंदी दरम्यान एक क्रमांक MH-27/DL-7166 तसेच ट्रक क्रमांक MH-27/DP-7114 यांना थांबवुन दोन्ही ट्रक चालकास ट्रक मध्ये भरलेल्या रेती बाबत रॉयल्टी विचारली असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने पोलीस नायक प्रणय बनाफर यांनी नाईट अधिकारी सपोनी मनोज चौधरी तसेच सपोनी राहुल किटे पोलीस ठाणे मौदा यांना घटनास्थळी बोलावुन माहीती दिली पोलीसांनी दोन्ही ट्रक चा जप्ती पंचनामा तयार करुन ट्रक क्रमांक MH-27/DL-7166 मध्ये भरलेली १० ब्रास रेती कीमती ५०,०००/— रुपये तसेच ट्रक क्रमांक MH-27/DP-7114 मध्ये भरलेली १० ब्रास रेती कीमती ५०,०००/— रुपये व दोन्ही ट्रक कींमती ७०,००,०००/— रुपये असा एकुन ७१,००,०००/— रुपयाचा चा माल जप्त करुन पोलीस ठाण्यात आणले. पोलीस अमंलदार अतुल निंबार्ते यांनी दिलेल्या तक्रारी वरुन पोलीस ठाणे मौदा येथे ट्रक क्रमांक MH-27/DL-7166 चालक क्रिष्णा विष्णुपंत जैस्वाल वय ४० वर्ष रा. अमरावती ट्रक मालक प्रशांत श्रावण बारई रा. अमरावती तसेच ट्रक क्रमांक MH-27/DP-7114 चालक किशोर सुभाषराव ठाकरे रा. अमरावती व ट्रक मालक गजानन चंदुसिंग धुमोन रा. अमरावती यांचे विरोधात कलम ३०३ (२), ४९ भारतीय न्याय सहिता २०२३ सहकलम ४८ (७), ४८ (८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनीयम, तसेच कलम ४, २१ खाणी व खनिजे (विकास आणि नियमन) अधिनीयम १९५७. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

त्यांनतर लगेच ट्रक क्रमांक MH-40/CM-8799 मध्ये सुद्धा चोरीची रेती भरुन भंडारा कडुन नागपूर कडे जात आहे. अशी माहीती मिळाल्याने त्याच ठिकाणी नाकाबंदी करुन ट्रक क्रमांक MH-40/ CM-8799 ला ताब्यात घेवुन ट्रक मध्ये असलेली १० ब्रास रेती कींमती ५०,०००/— रुपये ट्रक कींमती ३५,००,०००/— रुपये असा एकुन ३५,५०,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन ट्रक चालक मनोज मारोतराव जवने रा. अमरावती व ट्रक मालक कपिल राजेंन्द्र निस्ताने रा. अमरावती यांचे विरोधात पोअं अतुल निंबार्ते यांनी दिलेल्या तक्रारी यरुन पोलीस ठाणे मौदा येथे रेती चोरी चा वेगळा गुन्हा वरिल कलमान्वये नोंद करण्यात आलेला आहे.

वरिल दोन्ही गुन्हयात एकुन ०३ ट्रक किंमती १,०५,००,०००/— रुपये व एकुन ३० ब्रास रेती किंमती १,५०,०००/— रुपये असा एकुन १,०६,५०,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष ए पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग कन्हान यांचे मार्गदर्शनात श्री प्रमोद घोंगे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे मौदा, सपोनी मनोज चौधरी, सपोनी राहुल किटे, पोलीस हवालदार प्रकाश गाठे, पोलीस नायक प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार अतुल निंबार्ते, पोलीस अमंलदार शुभम ईश्वरकर, पोलीस ठाणे मौदा यांनी केली असुन गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.




## प्राणांतिक अपघात

**पोस्टे उमरेड :–** अंतर्गत हॉटेल मायेचा तडका समोर गडचिरोली ते नागपूर हायवे रोड येथे दिनांक १८/१०/२४ चे ०८/४५ वा. ते ०९/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– संजय राजीराम बांबोळे वय ४५ वर्ष रा. कोटगाव ता. नागभीड जि. चंद्रपूर ह. मु. मोरेश्वर देशमुख व्दारका सिआी उमरेड यांचे घरी किरायाने ता. उमरेड याचा मुलगा **मृतक नामे कलश** हा विनोद बागडे यांच्या मोसा क्र. एम.एच. ३४ सीके ९७९२ गाडीवर काही कामानिमित्य उमरेडला गेले घरी परत येत असता नागपूर ते उमरेड रोडने एक गाडी आली व त्यांना समोरचे काही न दिसल्याने विरूध्द दिशेने उभा असलेल्या ट्रक क्र. एम.एच. ४० बीजी ००१७ हयाला धडक दिल्याने मुलगा कलश ट्रक वर जावून धडकल्याने डोक्याला जबर मार लागल्याने उपचारासाठी उमरेडला भरती केले व त्यानंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे ट्रॉमा सेंटर येथे भरती केले व उपचार दरम्यान दि. २२/१०/२४ रोजी सायं. ०४/२० वा मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे उमरेड येथे आरोपी ट्रक चालकाविरूद्ध कलम २८५, १२५;इद्ध ,१०६ ;१द्ध बी.एन.एस. २०२३, ४, १२२, १०४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद केला असुन ट्रक चालकाचा शोध उमरेड पोलीस घेत आहे.

**रामटेक परीसरात सुरु असणाऱ्या वेश्याव्यवसायावर धाड टाकून देहव्यापार करणाऱ्या पिडीत महिलेची सुटका करून आरोपीतांना केले अटक नागपूर ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई**

पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील होटल नेचर पॉईंट हिवरा रोड रामटेक येथे यातील **आरोपी क्र. १)शुभम चंद्रभान ठाकुर रा. कालंका मंदीर जवळ रामटेक २) नरेंन्द्र शिवप्रसाद चौधरी रा. भजियाडन , ता. खैरलांजी ,जि. बालाघाट ३) शुभम काशीनाथ हाराडे रा .चिंचभवन पो. नयाकुंड, ता. पारशिवनी ४) प्रेमचंद घनशाम डडुरे रा .चिंचभवन पो. नयाकुंड, ता. पारशिवनी ५) लोकेश दयाराम रेवतकर रा. बोरबन ता. पारशिवनी ६) आनंद मनोहर सरवरे रा.चिंचभवन पोनयाकुंड ता. पारशिवनी** हे स्वत:चे आर्थिक फायदया करीता सुटका केलेली पिडीत मुलीला पैशाचे आमिश देवुन तिला देहव्यापारास प्रवृत्त करून पिडीत मुलीला हॉटेल नेचर पॉईंट हिवरा रोड रामटेक येथे रूम उपलब्ध करून देवुन तिचाकडुन देहव्यापार करवुन घेत आहे. अशी गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाल्याने दिनांक २३/१०/२०२४ रोजी चे ००/०१ ते ०१/३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ, पोस्टे पारशिवनी येथील सपोनि धनश्री कुटेमाटे, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय रामटेक विभाग येथील स्टाफ सह होटल नेचर पॉईंट हिवरा रोड रामटेक येथे जाऊन रेड केली असता सदर हॉटेलमध्ये अनैतिक देहव्यापार चालवत असल्याची खात्री झाल्याने आरोपी क्र. १) ते ६) यांना ताब्यात घेवुन आरोपीतांविरुध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३, ४, ५, ७ स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष ए पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोनि आसाराम शेटे, सपोनि पाटणकर, पोस्टे पारशिवनी येथील महिला सपोनि धनश्री कुटेमाटे, पोअं. राकेश बंधाटे, चापोशि संदीप कर्नाके, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय रामटेक येथील पोहवा विनय केदार, नितेश पिपरोदे, पोना अनिल सपाटे, मपोना ज्योत्सना बावनथडे, पोअं. सचिन गेडाम, मपोशि स्वाती सपाटे, चापोना लिलाधर तायडे, पोस्टे रामटेक येथील पोना प्रफुल रंधई, मंगेश सोनटक्के, पोअं शरद गिते, मपोशि स्नेहा डोंगरे, चापोहवा विशाल बोटारे, यांनी केली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**